प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १६.०२.२०२१**

## ऐरोली-कळवा दुहेरी उन्नत रेल्वे मार्गाकरिता सिडकोकडून एमआरव्हीसीला दिघा येथील जमीन देण्यात येणार

सिडकोतर्फे नवी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनला (एमआरव्हीसी) ऐरोली-कळवा दुहेरी उन्नत रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी नवी मुंबईतील दिघा येथील सर्व्हे क्र. १०, ५६६ चौ.मी. क्षेत्रफळाची आणि सर्व्हे क्र. २२, हिस्सा क्र. १,२ (पी), ३५३ चौ.मी. क्षेत्रफळाची, अशी एकूण ९१९ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन देण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. एमआरव्हीसीकडून सिडकोला २०१८ मध्ये ऐरोली-कळवा दुहेरी उन्नत रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी दिघा येथील उपरोक्त जमीन हस्तांतरीत करण्याबाबतची विनंती करण्यात आली होती.

**"सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांना सहकार्य करण्याच्या भूमिकेतून सिडकोने हा निर्णय घेतला आहे. सदर रेल्वे मार्गामुळे ठाणे स्थानकावरील गर्दीचा भार कमी होण्यासह कल्याण दिशेकडून येणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुखकारक होण्यास निश्चितच मदत होणार आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सदर जमिनीकरिता कोणताही आराखडा तयार करण्यात आला नसून ती नॉन नोडल क्षेत्रामध्ये मोडत आहे. सदर जमिनीचा बहुतांशी भाग हा प्रादेशिक उद्यान क्षेत्रात (रिजनल पार्क झोन) आणि अल्प भाग हा निवासी क्षेत्रात आहे. एमआरव्हीसी हा केंद्र शासनाचा रेल्वे मंत्रालया अंतर्गत येणारा सार्वजनिक उपक्रम आहे. तसेच नवी मुंबई भूमी विनियोग (सुधारित) अधनियम, २००८ नुसार सिडकोकडून जाहीर निविदा किंवा लिलावाद्वारे भूखंडांची विक्री करण्यात येते. परंतु यास केंद्र शासन/राज्य शासन आणि त्यांचे उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा स्वायत्त शासकीय संस्था यांचा अपवाद असून संबंधितांकडून अर्ज प्राप्त झाल्यावर भाडेपट्टा अधिमूल्याच्या दराने त्यांना भूखंड वाटपित करण्यात येतात.

या सर्व बाबींचा तसेच सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांना सहकार्य करण्याच्या उद्देशाने दिघा येथील सदर ९१९ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन ही रु. २२,५००/- प्रती चौ.मी. या दराप्रमाणे रु. २,०६,७७,५००.००/- (रु. दोन कोटी सहा लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे मात्र) भाडेपट्टा अधिमूल्य आकारून ९० वर्षांच्या भाडेपट्ट्याने एमआरव्हीसीला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उपरोक्त दर हा चालू आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत म्हणजे ३१ मार्च २०२१ पर्यंत वैध असून वाटप पत्र ३१ मार्च २०२१ पूर्वी दिले न गेल्यास सुधारित दर लागू होईल. भाडेपट्टा अधिमूल्याव्यतिरिक्त उर्वरित शुल्क, जीएसटी आणि वार्षिक भाडेही आकारण्यात येणार

आहे. तसेच सदर जमिनीचा वापर हा केवळ ऐरोली-कळवा उन्नत रेल्वे मार्गाच्या उभारणीकरिता करता येणार असून अन्य कोणत्याही उद्देशाकरिता करता येणार नाही. सदर बाब ही नवी मुंबई भूमी विनियोग (सुधारित) अधिनियम, २००८ मधील अधिनयमांच्या अधीन राहील.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**